महा मेट्रो

PUNE METRO

# जागतिक पर्यावरण दिनानिमित्त महामेट्रो तर्फे विविध उपक्रमांचे आयोजन



जागतिक पर्यावरण दिनानिमित्त महामेट्रोतर्फे शहराच्या विविध भागांमध्ये वृक्षारोपणाचे कार्यक्रमांचे आयोजन केले. याबरोबरच महामेट्रोचे माहिती केंद्र व सहयोग केंद्र जे नागरिकांच्या सुविधांसाठी बनविण्यात आले आहे. तेथे भेट देणाऱ्या सर्व नागरिकांना झाडाचे रोप भेट देण्यात आले. याव्यतिरिक्त नदीपात्रात महामेट्रोतर्फे स्वछता मोहीम राबविण्यात आली.

महामेट्रो पर्यावरण संवर्धनासाठी कटिबद्ध असून महामेट्रो कामादरम्यान येणाऱ्या सर्व झाडांचे पुनर्रोपण मेट्रोतर्फे पुणे शहराच्या विविध भागात करण्यात येत आहे . महामेट्रोने आतापर्यंत १०८० झाडांचे पुनर्रोपण बंडगार्डन (५), कासारवाडी एस टी पी प्लॅन्ट (४५), खडकी कॅन्टोमेंट बोर्ड (३२), वनाज डेपो (२१), ऍग्रीकल्चर कॉलेज ग्राउंड (५०५), एआरएआय (ARAI) हिल (४५२) , येरवडा नदी काठ (२०) येथे झाडांचे पुनर्रोपण केले आहे . पुनर्रोपण करताना ज्या त्या भागातील झाडे त्याच भागात महामेट्रोने लावली आहेत, जेणेकरून प्रत्येक भागातील झाडाच्या संख्येवर प्रभाव पडू नये . याव्यतिरिक्त महामेट्रोने आतापर्यंत पीएमसी आणि पीसीएमसी नगरपालिका क्षेत्रात विविध ठिकाणी १२७०० नवीन झाडे लावण्यात आली आहेत .

५ जून २०१९ रोजी जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून पुणे मेट्रोने खराडी वनविभाग जमीन (१००), पिंपळे सौदागर कास्टिंग यार्ड (५०), वाघोली कास्टिंग यार्ड (११५), वनाज व कृषी महाविद्यालय डेपो (९३), मारूंजे कास्टिंग यार्ड (३२), कृषी महामविद्यालय (३५), डेक्कन कॉलेज ग्राउंड कास्टिंग यार्ड (८०) एकूण - ५०५, अश्याप्रकारे मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करण्यात आले आहे. वृक्षारोपण करताना देशी वाणाची झाडे जसे लिंब, वड, पिंपळ , महोगनी , चिंच इत्यादी झाडे लावण्यावर भर देण्यात आला आहे .





बालगंधर्व रंग मंदिर येथील माहिती केंद्रात नागरिक मेट्रोबद्दल माहिती जाणून घेण्यासाठी भेट देत असतात दि. ५ जून जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून पुणे मेट्रोने ज्या नागरिकांनी माहिती केंद्रास भेट दिली त्यासर्वांना एक झाड भेट देण्यात आले. अश्याप्रकारे तेथे १२५ झाडांचे वाटप करण्यात आले. याप्रमाणे कोथरूड येथील सहयोग केंद्र (१५ वृक्ष ) व बंडगार्डन (१५वृक्ष ) येथील सहयोग केंद्र येथे भेट देणाऱ्या सर्व नागरिकांना एक- एक झाड भेट देण्यात आले . अश्याप्रकारे एकूण १५०झाडे महामेट्रोतर्फे दि ५ जून रोजी भेट देण्यात आली .






महामेट्रो पर्यावरण रक्षणासाठी बांधील असून शहराच्या विविध भागात वृक्षारोपण कार्यक्रम हाती घेतला आहे . यासाठी पुणे मेट्रोला महापालिका , वनखाते , कृषी महाविद्यालय खडकी कॅन्टोमेंट बोर्ड यासर्वांचे सहयोग मिळाला आहे .